# अमरावती महानगरपालिका अमरावती.
## सामान्य प्रशासन विभाग

Mail gad.amravati@gmail.com
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२१-२५७६४८२


दि. २३/ ०६ / २०२५

जा.क्र अमनपा/साप्रवि/उपा/२४०५/२०२५

प्रति,

१. श्रीमती शांता उकर्डा अठोर (आठवले)
२. श्रीमती विजया उकर्डा अठोर (आठवले)
रा.c/o संदीप बागडे, भोवते लेआऊट, अमरावती
महाराष्ट्र ४४४६०

**विषयः-** **अमरावती महानगरपालिका प्रशासनने दि.१८/०९/२०१२ को मेरे पिता उकर्डा अठोर इनकी अनुकंपा नोकरी गैरकानुन तरीकेसे अनोरस बेटे सागर को दि थी.**

संदर्भः-
१. जा.क्र.अमनपा/साप्रवि/आयुक्त/१२१४/२०२५ दिनांक.०६/०३/२०२५
२. आपले दि.१७/०३/२०२५ रोजीचा प्राप्त अर्ज.
३. आपला दि.२५/०३/२०२५ रोजीचा प्राप्त माहिती अधिकार अर्ज.
४. जा.क्र.अमनपा/साप्रवि/उपा/१८८२/२०२५ दिनांक.२४/०४/२०२५
५. आपले दि.२८/०५/२०२५ रोजीचा प्राप्त अर्ज.
६. मा.अपर जिल्हादंडधिकारी अमरावती यांचे प्राप्त पत्र दि.२१/०५/२०२५

आपला विषयांकित अर्ज क्र. ३ व ४ चे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सादर संदर्भीय अर्ज/निवेदना नुसार आपण वडीलांची अनुकंपा नोकरी व मालमत्ते संबंधित मुद्दयांवर मा. आयुक्त महोदय यांचे कक्षात दि.३१/१२/२०२४ रोजी अर्जदार, गैरअर्जदार व संबंधित महानगरपालिका अधिकारी यांचे समक्ष सुनावणी घेऊन चर्चा करण्यात आली. सदर सुनावणीचे अनुषंगाने संदर्भ क्र. १ नुसार मा.आयुक्त महोदय यांनी दि. ०६/०३/२०२५ रोजी आदेश पारीत करण्यात आले आहे. सदर आदेशानुसार आपण उपस्थित केलेले मुद्दे निकाली काढण्यात आले असुन आपणास आदेशाची प्रत तसेच आपले मागणीनुसार सदर सुनावणीची ऑडियो व्हिडीयो क्लीप सुध्दा पुरविण्यात आलेली आहे.

परंतु त्यानंतरही आपण वरील मुद्दे नमुद करुन संदर्भ क्र.२ नुसार पुनःश्च अर्ज सादर केला व त्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची प्रत संदर्भ क्र.३ नुसार माहिती अधिकारअंतर्गत मागीतली त्यानुसार आपणास या कार्यालयाकडुन संदर्भ क्र.४ नुसार झालेल्या कार्यवाहीची प्रत पोस्टाद्वारे पाठविण्यात आली व माहिती अधिकार अर्जानुसार तिच कार्यवाहीची प्रत व्यक्तीशः आपणास पुरविली असता आपण प्रत घेण्याचे नाकारले व तसे पत्रावर लेखी दिलेले आहे. मा.आयुक्त महोदय यांचे दि. ०६/०३/२०२५ रोजीचे आदेशानुसार आपले प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.

तरी आपणास विनंती की उपोषणा पासुन परावृत्त व्हावे व आपल्या निवेदनानुसार दि.०१/०७/२०२५ रोजी ईशा-याप्रमाणे कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**सहपत्रः-** संदर्भ क्र.१ व ४ प्रत सोबत संलग्न.

**उपायुक्त (प्रशा.)**
**महानगरपालिका अमरावती.**

**प्रतिलिपी:-**

१. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कॅम्प रोड अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.

२. मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.

३. मा.अप्पर जिल्हादंडाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, कॅम्प रोड अमरावती यांना माहिती करिता सादर.

४. मा. अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांना माहिती करीता सादर.

५. सहाय्यक आयुक्त, दस्तुरनगर पुर्व झोन क्र.३, महानगरपालिका, अमरावती यांना माहिती करीता.

६. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गाडगे नगर पोलिस स्टेशन , गाडगेनगर अमरावती.

# अमरावती महानगरपालिका अमरावती
## सामान्य प्रशासन विभाग

Mail- gad.amravati@gmail.com

कार्यालय दुरध्वनी क्र. – ०७२१-२५७६४८४


जा.क्र.अमनपा/साप्रवि/आयुक्त / 1214 /२०२५

दिनांक - 06 /03 /२०२५

**अर्जदार:**

१) श्रीमती शांता उकर्डा अठोर (आठवले)
२) श्रीमती विजया उकर्डा अठोर (आठवले)
रा. c/o संदीप बागडे, भोवते लेआऊट, अमरावती.

**गैरअर्जदार:**

१) श्रीमती कुंता उकर्डा अठोर (आठवले)
२) श्री.सागर उकर्डा अठोर (आठवले)
३) श्री.आकाश उकर्डा अठोर (आठवले)
रा. बेनोडा झोपडपट्टी, वार्ड नं. ६५ अमरावती.

**सुनावणी दिनांक ३१/१२/२०२४**

अर्जदार यांचा दि. ०६/११/२०२४ व दि. ०३/१२/२०२४ रोजीचे अर्जाचे अनुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार यांना आपली पक्ष मांडण्याची संधी देण्याकरीता दि. ३१/१२/२०२४ रोजी सुनावणी आयोजीत करण्यात आली. सदर सुनावणी करीता अर्जदार- श्रीमती विजया उकर्डा अठोर (आठवले), गैरअर्जदार- श्रीमती कुंता उकर्डा अठोर (आठवले) श्री. सागर उकर्डा अठोर (आठवले), श्री. आकाश उकर्डा अठोर (आठवले) व महानगरपालिकेतर्फे अधिक्षक, साप्रवि, सहा.क्षेत्रीय अधिकारी झोन क्र ३ उपस्थित झाले.

**श्रीमती विजया अठोर नमुद केले ते खालीलप्रमाणे,**

" माझे लेखी निवेदन विचारात घ्यावे. माझे वडील लिपीक या पदावर कार्यरत होते. महनगरपालिके तर्फे त्यांचे फंडातील पैसे सर्वांना समान हिश्यात देण्यात आले. त्याप्रमाणे तत्कालीन आयुक्त श्री. नविन सोना सर यांनी सन २०१२ मध्ये यांचेकडून श्री. सागर उकर्डा अठोर याला अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. माझी व माझे आईची बिकट परिस्थिती महानगरपालिकेने विचारात घेतली नाही. तसेच न्यायालयीन प्रक्रियेतील वकील मॅनेज करण्यात आले असे मत मांडले. यावर श्री. सागर उकर्डा अठोर यांनी न्यायालयीन निर्णय मान्य असल्याचे सांगितले. मी श्रीमती विजया उकर्डा अठोर व माझी आई श्रीमती शांताबाई उकर्डा अठोर आम्हा दोघींना माझे वडीलांच्या शासकीय जमिनीवरील राहत असलेल्या घरांच्या असेसमेंट मध्ये नावाचा उल्लेख नसून परस्पर मालमत्ता हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. माझे कडे असलेल्या जुन्या दस्तऐवजापैकी नळ कर पावती व विज बिल पावती माझे आईचे नावे असल्याने मालमत्ता भोगवटदार म्हणून आईचे नाव नोंद करणे बाबत झोन क्र. ३ येथे दस्तऐवजाची पाहणी केली असता मला दस्तऐवज

दाखविण्यात आले नाही. सन १९९४-९५ मध्ये नेहरु रोजगार योजने अंतर्गत कुंताबाई यांनी शांताबाई चे नांवे कर्ज घेतलेले असून तरी सुध्दा श्रीमती शांताबाई उकर्डा अठोर यांचे नाव असेसमेंट का नाही. असेसमेंटमध्ये कोणत्या आधारावर नाव टाकण्यात आलेले आहे. "

**गैरअर्जदार श्री सागर उकर्डा अठोर यांनी आपली बाजु मांडली ते खालीलप्रमाणे,**

"सदर मालमत्ता शासकीय जागेवरील असून पीआरकार्ड वर महाराष्ट्र शासन असा उल्लेख असून तसेच प्रॉपर्टी कार्ड मध्ये श्री. भास्कर आठवले, श्री. ठाकुर, श्री. यादव भाडेकरु यांचे नाव आहे. शासकीय जमिनीवर जे वास्तव्य करतात ते भोगवटदार असताता तसेच विज बिल हा पुरावा झोपडपट्टी क्षेत्र असल्याने विचारत घेणे योग्य नाही व माझे आईवडील व कुटूंबाचा फोटा दाखविण्यात आला. विजया यांनी दिलेल्या सन २०१२ जिल्हाधिकारी कार्यालय येथील अर्जामध्ये अंजनगाव सुर्जी रहिवाशी म्हणून त्यांनी स्वतः अर्ज केल्याची प्रत व दि. १५/०१/२००५ च्या न्यायालयीन निर्णयप्रत दाखविली आहे. "

**साप्रवि अधिक्षक महानगरपालिका अमरावती यांनी असे नमुद केले,**

" अर्जदार श्रीमती विजया उकर्डा अठोर यांनी अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्याकरीता मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले याचीका क्र १३४१/२०१३ न्यायालयाने दि.२०/०७/२०१६ रोजीचे आदेशान्वये खारीज केलेले आहे. तसेच सदर आदेशाविरोधात अर्जदार यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचीका ३७६००/२०१६ अन्वये अपील दाखल केली. सदर अपील देखील मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०७/२०१८ रोजीचे आदेशान्वये खारीज केले व महानगरपालिकेद्वारा प्रकरण नस्तीबंद करण्यात आलेले आहे. "

**महानगरपालिकेतर्फे सहा.क्षेत्रीय अधिकारी यांनी नमुद केले ते खालीलप्रमाणे,**

"विषयांकीत मालमत्ता शासकीय जागा असुन सदर जागेचा भोगवटाबाबत घेतलेली नोंद प्राप्त वारसाहक्कानुसार घेण्यात आलेली आहे. व वेळोवेळी अर्जदार यांनी केलेल्या मागणीनुसार महानगरपालिकाअभिलेख पुरविलेले आहे. "

अर्जदार, गैरअर्जदार व संबंधीत महानगरपालिका अधिकारी यांचे कथन ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे,

**-- आदेश --**

१. सहा. आयुक्त, झोन क्र. ३ यांनी अर्जदार यांना आवश्यक दस्तऐवज तपासणी करीता उपलब्ध करुन दयावे.
२. दि. १५/०१/२००५ रोजी विद्यमान दिवाणी न्यायालय, अंजनगाव सुर्जी यांनी दिलेल्या आदेशानुसार विषयांकीत मालमत्ता संबंधीत महानगरपालिका अभिलेखामध्ये भोगवटदार म्हणुन नोंद घेण्याबाबतची कार्यवाही संबंधीत सहाय्यक आयुक्त, पुर्व झोन क्र.३ दस्तुर नगर, महानगरपालिका अमरावती, यांनी करावी.

३. अनुकंपा तत्वावरील नियुक्ती बाबतचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयाद्वारा दि.०५/०७/२०१८ रोजीचे आदेशान्वये अंतीमत: निकाली काढण्यात आले असुन सदर अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतचा दावा अमान्य करुन खारीज करण्यात येत आहे.

(सचिन कलंत्रे)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

प्रत:-

१. श्रीमती विजया उकर्डा अठोर ,(आठवले) श्रीमती शांता उकर्डा अठोर ,(आठवले)रा .c/o संदीप बागडे, भोवते लेआऊट, अमरावती .

२. श्रीमती कुंता उकर्डा अठोर (आठवले) , श्री. सागर उकर्डा अठोर (आठवले), श्री. आकाश उकर्डा अठोर (आठवले) रा. बेनोडा झोपडपट्टी, वार्ड नं. ६५ अमरावती.

प्रतिलिपी:-

१. अतिरिक्त आयुक्त -१, महानगरपालिका, अमरावती यांना माहिती करीता.
२. उपायुक्त (प्रशा.) महानगरपालिका, अमरावती यांना माहिती करीता.
३. विधी अधिकारी , महानगरपालिका,अमरावती यांना पुढील कार्यवाही करीता.
४. सहाय्यक आयुक्त, पुर्व झोन क्र.३ दस्तुरनगर, महानगरपालिका अमरावती यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता.

सही/-
(सचिन कलंत्रे)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत
FORMAT OF APPLICATION FOR OBTAINING INFORMATION UNDER THE RIGHT TO INFORMATION ACT, 2005

अमरावती महानगरपालिका

# अर्जाचा नमुना
Application Form

10 रु. COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

आ.क्र. 402 25/03/2025

प्रति, विभागाचे नाव मिळी / ला
To,
शासकीय माहिती अधिकारी 28/03/2025
The State Public Information Officer,

मा. आयुक्त साहेब महानगर पालिका अमरावती

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :
Full name of the applicant: विजया उर्फ अजय (भावळे)

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :
Address: द/० संदीप बागडे, भोवले के ग्रौंड
अमरावती 8390678278

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील
Particulars of Information required. दि. 17/03/2025 रोजी मा. आयुक्त साहेब यांना दि ............ च्या सुनावणी निर्णयावरिल 60 दिवस लोगातल्या कारणे व दि. 17/11/2016 च्या शासननिर्णयानुसार बाजार आरोर याला स्वरीत करण्या

(एक) माहितीचा विषय
Subject matter of information मेरे अर्ज दीवा होना. त्या अनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची छायांकीत प्रत मिळणे बाबत

(तीन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी
The period to which the Information is required दि. 17/03/2025 ते माहिती मिळे पर्यंत

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन
Decription the Information is required दि. 17/03/2025 च्या अनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची छायांकीत प्रत मिळणे बाबत

(चार) माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether Information is required by post in person
व्यक्तीशः

(ज्याला शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल)
(The actual postal charges shall be included additional fees.

(पाच) जर टपालाने माहिती असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे.
in Case by Post
स्पीड

(साध्या नोंदणीकृत किंवा शिघ डाकने)
(Ordinary, Registered or Speed)

६) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा असे
Whether the applicant is below porty line
नाही

(असल्यास, त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी)
(if yes, attach the photocopy of the proof there of)

दिनांक 25/03/25
Date

ठिकाण अमरावती
Place

अर्जदाराची सही
Signature of the applicant

विषय स्वरूपात दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन देणे / सेवाविषयक बाब / लायसेन्स इत्यादी)

दि. 17/03/2025

प्रति,

मा. मनपा आयुक्त सचीन कलंत्रे सर
महानगर पालीका अमरावती

अर्जदार : कु. विजया उकर्डा अठोर (आठवले) मो. 8390678278

विषय : ① दि. 31/12/2024 रोजीच्या सुनावणीचा निर्णय दि. 02/01/2025 रोजी येने अपेक्षीत होता पण असा कोणता नेता दि. 02/1/2025 रोजी मनपा मध्ये आला किंवा कोणत्या नेताच्या दबावाखाली हा निर्णय थांबवण्यात आला किंवा निर्णय थांबण्याचे इतर कारणे लेखी स्वरूपात मिळणे बाबत

② महाराष्ट्र राज्य अनुकंपा नोकरी नियम व अटीचा शासन निर्णय क्रमांक 1014/प्र.क्र. 155/8 दि. 17/11/2016 च्या अनुषंगाने अनवरस मुलगा सागर अठोर याला माझ्या वडिलांच्या अनुकंपा नौकरी वरून त्वरीत खारीज करणे बाबत.

महोदय,

वरिल दोन्ही विषयांच्या अनुषंगाने नम्र विनंती अर्ज सादर करते की, दि. 31/12/2024 रोजी मा. आयुक्त साहेबांनी अनुकंपा नोकरी व घर हस्तांतरनच्या विषयावर सुनावणी घेतली असुन या सुनावणी मध्ये मा. आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आले की दि. 18/09/2012 रोजी उकर्डा पुंडलीक अठोर यांची अनुकंपा नोकरी शासण निर्णयामध्ये अनवरस मुलाचा अंतरभाव नसताना व आम्हाला सक्सेशन सर्टीफीकेट मिळुन सुद्धा बेकायदेशीर पणे, राजकीय हस्तक्षेपाने सागर यास देण्यात आली.

नोकरी मिळवल्यानंतर मनपा अधीकारी कर्मचारी हाताशी धेवुन व राजकीय हस्तक्षेपात माझ्या आईच्या घर क्र 759 बेनोडा अम. या घराचे मुळ नावाचे असेसमेंट रेकॉर्ड गायब करूण बेकायदेशीर पणे जाली दस्तावेज बनवुन घराचे हस्तातरण करण्यात आले नंतर 2022 मध्ये P.M.Y घेण्याकरिता घर पाडण्यात आले. हे सिद्ध झाले आहे. असे असतांना सागर याला अनुकपा नोकरीवर राहण्याचा अधीकार उरत नाही कारण अनुकपा नोकरी ही मृत्यत कर्मचाऱ्यांच्या कुटबाला संकटामधुन बाहेर काढण्यासाठी कुटुबातील एका व्यक्तीला दिली जाते. नियम व अटी घालुन दिली जाते अट अशी आहे की अनुकंपा धारकाने संपुर्ण

दि. 17/03/25 [illegible]
सहा. आयुक्त, [illegible] म.न.पा., अमरावती

अहप्र/ GHD

कुटुंबाला सांभाळुन चालवायचे असते तसे त्याच्याकडुन प्रतिज्ञापत्र देखील घेतले जाते या प्रतीला प्रतीज्ञा पत्राचे उल्लघंन झाल्यास किंवा कुटुंबातील एक व्यक्तीचे जरी तक्रार आल्यास त्यांची अनुकंपा नौकरी काढुन घेण्यात येईल असा महाराष्ट्र राज्य शासन निर्णय 17/11/2016 रोजी तयार करण्यात आला आहे. आणी हिच अनुकंपा नौकरीची अट आहे. मी व माझी आई उकडी पुंडलीक अठोर यांचे दि. 15/01/2005 च्या न्यायालयीन आदेशानुसार कायदेशीर कुटुंब आहोत सागर व त्याच्या कुटुंबाने आमच्यावर सुरुवाती पासुन आता पर्यंत अन्यायच केला आहे. हे सुनावणी मध्ये सिध्द झाल्यानंतर त्याला अनुकंपा नौकरीवर राहण्याचा अधिकार राहत नाही. मनपा प्रशासन सर्व शासन निर्णयांच कडे कोटपालन करत असते व नियमाने काम करते म्हणुन आमच्या प्रकरणात जर कुठल्याही राजकीय नेत्याचा दबाव नसेल तर त्वरीत वरिल शासण निर्णया नुसार सागर याला नौकरी वरून कायमचे काढुन टाकण्यात यावे.

दि. 31/12/2024 च्या सुनावणीचा निर्णय दि. 02/01/20[illegible] रोजी येणे अपेक्षीत होता पण तो निर्णय व धा. क्र. 759 या घराचे असेस्मेंट रेकॉर्ड कोणत्या नेत्याच्या दबावामुळे थांबण्यात आले किंवा इतर कोणत्या कारणाने थांबण्यात आले ते त्वरीत लेखी स्वरुपात कळवावे हि नम्र विनंती.

आपली विनित

Dhawale

प्रतिलीपी,

1. विद्यमान सरन्यायाधीश मा. ~~संज~~ संजीव खन्ना सर सुप्रिम कोर्ट, नई दिल्ली.

सोबत

दि. 17/11/2016 चा शासन निर्णय.

# अमरावती महानगरपालिका अमरावती.
## सामान्य प्रशासन विभाग

Mail gad.amravati@gmail.com
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२१-२५७६४८२

जा.क्र अमनपा/साप्रवि/उपा/१८८२/२०२५ दि. २४/०४/२०२५

प्रति,

१) श्रीमती शांता उकर्डा अठोर (आठवले)
२) श्रीमती विजया उकर्डा अठोर (आठवले)
रा. c/o संदीप बागडे, भोवते लेआऊट, अमरावती
महाराष्ट्र ४४४६०

**विषय:- १. दि. ३१/१२/२०२४ रोजीच्या सुनावणीचा र्निणय दि.०२/०१/२०२५ रोजी येणे अपेक्षित होता पण असा कोणता नेता दि. ०२/०१/२०२५ रोजी मनपा मध्ये आला किंवा कोणत्या नेताच्या दबावाखाली हा निर्णय थांबविण्यात आला र्निणय थांबविण्याचे इतर कारणे लेखी स्वरुपात मिळणेबाबत.**

**२. महाराष्ट्र राज्य अनुकंपा नौकरी नियम व अटी शासन निर्णय क्रमांक. १०१४/प्र.क्र १५५/०८/ दि.१७/११/२०१६ च्या अनुषंगाने अनवरस मुलगा सागर अठोर याला माझ्या वडिलांच्या अनुकंपा नौकरी वरुन खारीज करणेबाबत.**

संदर्भ:- श्रीमती. विजया उकर्डा अठोर (आठवले) यांचा दि.१७/०३/२०२४ प्राप्त अर्ज.

आपणास संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की आपला दि.०६/११/२०२४ व दि.०३/१२/२०२४ रोजीचे अर्जाच्या अनुषंगास आपणास व गैरअर्जदार यांना आपले पक्ष मांडण्याची संधी देण्याकरीता दि.३१/१२/२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अर्जदार ,गैरअर्जदार व संबंधित महानगरपालिका अधिकारी यांचे कथन ऐकल्यानंतर त्याअनुषंगाने दि.०६/०३/२०२५ रोजी खालील प्रमाणे आदेशपारित करण्यात आलेल्या आदेशाची प्रत आपणास व गैरअर्जदार यांना पुरविण्यात आलेली आहे.

<u>र्निगमित आदेशानुसार</u>

१. सहाय्यक आयुक्त, पुर्व झोन क्र. ३ दस्तुरनगर, यांनी आपणास तपासणी करीता दस्तऐवज उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

२. दि. १५/०१/२००५ रोजी विद्यमान दिवाणी न्यायालय, अंजनगाव सुर्जी यांना दिलेल्या आदेशात नमुद वारसानुसार मालमत्ता संबंधीत नावाची नोंद घेण्यात आली असुन संदर प्रकरण निकाली काढण्यात आल्याचे झोन क्र. ३ मार्फत आपणास व गैरअर्जदार यांना जा.क्र.अमनपा/सहा.आयु/९८७/२०२५ दि.११/०३/२०२५ चे पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

३. अनुकंपातत्वावरील नियुक्ती बाबतचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारा दि. ५/०७/२०१८ रोजीचे आदेशान्वये अंतीमतः निकाली काढण्यात आले असुन अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबत दावा अमान्य करुन खारीज करण्यात येत आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी दि.३१/१२/२०२४ चे सुनावणी

मध्ये आदेशीत केले असुन तसे दि.०६/०३/२०२५ चे सुनावणी आदेशामध्ये नमुद असुन आदेशाची प्रत आपणास पुरविण्यात आली आहे.

४. आपण या कार्यालयास सादर केलेला माहिती अधिकारी अर्ज दि.०५/०३/२०२५ नुसारी आपणास दि. ३१/१२/२०२४ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणी ची वोडियो व्हिडीयो क्लीप पुरविण्यात आलेली आहे.

यानुसार आपणास कळविण्यात येते की आपण सादर केलेल्या संपुर्ण विनंती अर्जानुसार सुनावणी घेण्यात आली व वरील प्रमाणे आपल्या संपुर्णअर्जातील मुद्दयाची पुर्तता करुन आपले प्रकरण निकाली काढण्यात आले आहे. परंतु आपण सादर केलेल्या संदर्भिय अर्जानुसार असे दिसुन येत आहे की आपला गैरअर्जदार यांचेशी असणारे कौटुंबिक वाद विवादामध्ये प्रशासनास वेठीसधरत आहात.

तरी आपणास यापत्राद्वारे कळविण्यात येते की सदर प्रकरण अंतीमतः निकाली निघाले असुन या नंतर आपला या विषयी येणा-या कुठल्याही प्रकारचे अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

**उपायुक्त (प्रशा.)**
**महानगरपालिका अमरावती.**

प्रतिलिपी:-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. मा. अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांना माहिती करीता सादर.
३. सहाय्यक आयुक्त, दस्तुरनगर पुर्व झोन क्र.३, महानगरपालिका, अमरावती यांना माहिती करीता.

Athawale
25/04/25

माहिती होण्याचे कारण

(1) दि 17/03/2025 रोजी मा. आयुक्त साहेब यांनी जी काही कार्यवाही केली त्या कार्यवाहीच्या कागदपत्रांची छायांकीत प्रत
[illegible] 66 [illegible]

(2) सुनावणीचे निर्णय [illegible] कारणे लिखीत स्वरुपात